सकाळ ॲग्रोवन १२
सोमवार, ३० जून २०२५

# एकात्मिक पाणलोट विकासातील अनुकूलन तंत्रे

डॉ. राहुल शेलार

**एकात्मिक पाणलोट विकासामधील अनुकूलन तंत्रे नैसर्गिक संसाधनांचे रक्षण करतात, स्थानिक समुदायांची लवचीकता वाढवतात. बदलत्या हवामानाचे परिणाम अधिक प्रभावीपणे सहन करण्यास मदत करतात.**

पाणलोट विकास हा हवामान बदलामुळे होणाऱ्या दुष्परिणामांशी, विशेषतः पाण्याच्या उपलब्धतेवरील परिणामांशी आणि जमिनीच्या ऱ्हासाशी जुळवून घेण्यासाठी एक प्रभावी मार्ग आहे.

## जल संवर्धन

- शेततळे, तलाव, जुन्या विहिरींचे पुनरुज्जीवन आणि सामुदायिक टाक्यांमध्ये पावसाचे पाणी अडवून साठवावे. यामुळे दुष्काळ काळात पाण्याची उपलब्धता सुनिश्चित होते.
- विहिरी आणि कूपनलिकेमध्ये पाणी जिरवण्यासाठी भूजल पुनर्भरणाचा अवलंब करावा. सिमेंट नाला बांध, गॅबियन बंधारे, शोष खड्डे करावेत. यामुळे भूजल पातळी वाढते, ज्यामुळे भूगर्भातील पाण्याचा साठा वाढतो.

## कार्यक्षम सिंचन पद्धती

- पाण्याचा अपव्यय टाळून पिकांना आवश्यक तेवढेच पाणी पुरवावे. यामुळे पाण्याची बचत होते, कमी पाण्यात जास्त उत्पादन घेता येते.
- पीकवाढीच्या अवस्थेनुसार सिंचन करावे.
- समुदायामध्ये पाणी वापराबाबत जागरूकता निर्माण करावी. पाणी वाटप आणि व्यवस्थापनाचे नियम ठरवावेत.

## आर्द्रता संवर्धन

**समोच्च रेषा बांधबंदिस्ती, समोच्च रेषा खंदक**

- जमिनीच्या उतारावर समोच्च रेषेत बांध घालून किंवा खंदक खणून पावसाचे पाणी अडवणे आणि मातीची धूप थांबवणे आवश्यक आहे. यामुळे जमिनीत पाणी मुरते.

**आच्छादन**

- पिकांचे अवशेष किंवा इतर नैसर्गिक आच्छादन वापरून जमिनीतील ओलावा टिकवून ठेवता येतो. बाष्पीभवन कमी होते.

**धूप नियंत्रण**

- डोंगराळ प्रदेशात पायऱ्या पायऱ्यांची शेती करून मातीची धूप थांबवता येते.
- जमिनीच्या उतारावर गवत किंवा झाडे लावून नैसर्गिकरीत्या पाण्याची गती कमी करणे गरजेचे आहे.

## हवामान-स्मार्ट शेती पद्धती

- **दुष्काळ-प्रतिरोधक आणि पूर-प्रतिरोधक पिकांची निवड :** स्थानिक हवामानाशी जुळवून घेणाऱ्या पिकांच्या जातींची लागवड करावी.
- **पीक विविधीकरण:** एकाच प्रकारचे पीक न घेता विविध पिकांची लागवड करावी. जेणेकरून हवामानातील बदलांमुळे एका पिकाचे नुकसान झाल्यास इतर पिकांचे उत्पादन मिळते.
- **सेंद्रिय शेती आणि कमी मशागत:** जमीन आरोग्य सुधारणा, पाणी धरून ठेवण्याच्या क्षमतेमध्ये वाढ आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी जमिनीची कमीत कमी मशागत करावी.



जलसंवर्धनासाठी बंधाऱ्यांची उभारणी करावी.

## जैविक विविधता आणि परिसंस्था व्यवस्थापन

- **स्थानिक जैवविविधतेचे संरक्षण :** स्थानिक हवामानाशी अधिक जुळवून घेणाऱ्या स्थानिक पीक जाती तसेच पशुधनाच्या जातींचे जतन करावे.
- **नदीकाठच्या क्षेत्राचे व्यवस्थापन :** नद्या आणि ओढ्यांच्या काठांवर झाडांची लागवड करून धूप थांबवावी. जलचर प्राण्यांसाठी अधिवास निर्माण करावेत.

## समुदाय सहभाग, क्षमता बांधणी

- **स्थानिक ज्ञानाचा वापर :** पारंपारिक ज्ञान आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या अनुभवांचा पाणलोट व्यवस्थापनात समावेश करावा.
- **प्रशिक्षण आणि जागरूकता कार्यक्रम :** शेतकऱ्यांना आणि स्थानिक लोकांना हवामान बदलाचे परिणाम आणि त्यांच्याशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञानाबद्दल माहिती द्यावी.
- **समुदाय-आधारित आपत्ती तयारी :** पूर, दुष्काळ किंवा इतर नैसर्गिक आपत्तीसाठी स्थानिक समुदायांना प्रशिक्षित करणे आणि त्यांना तयारीसाठी मदत करणे आवश्यक आहे.

## प्रारंभिक सूचना प्रणाली आणि धोक्याचे मूल्यांकन

- **जलशास्त्रीय निरीक्षण :** पर्जन्यमान, नदीतील पाण्याची पातळी आणि भूजल पातळीचे नियमित निरीक्षण करावे, जेणेकरून पूर किंवा दुष्काळाची पूर्वसूचना मिळू शकेल.
- **हवामान अंदाज :** शेतकऱ्यांना आणि समुदायांना आगामी हवामानाबद्दल अचूक माहिती पुरवावी, जेणेकरून शेतकरी त्यानुसार शेतीचे नियोजन करू शकतील.
- **संवेदनशीलता नकाशे :** हवामान बदलास सर्वाधिक संवेदनशील असलेल्या क्षेत्रांची आणि समुदायांची ओळख पटवून त्यांच्यासाठी विशिष्ट अनुकूलन योजना तयार करणे आवश्यक आहे.

- डॉ. राहुल शेलार, ९८८१३८०२२७
(मृदा व जल संधारण अभियांत्रिकी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)